**निवेदन**
आपल्या प्रभागातील समस्या, दैनंदिन अडचणी, फसवणूक, अन्याय-अत्याचार, मुजोरी तसेच आपल्या मनातील सूचना, शंका, उपाय यासाठी सा. संघर्षाचा आवाज आपणास खास व्यासपीठ मिळवून देत आहे.
करा त्वरा, होऊ द्या मनातला निचरा!
संपर्क : ७२७६८७१००८

साप्ताहिक

# संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013
■ https://sangharshachaaawaz.in

■ वर्ष : १४ वे ■ अंक : ०३ रा ■ सोमवार दि.१० ऑगस्ट ते १६ ऑगस्ट २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने - ०४

वाढीव वीजबिलासाठी... पान २ वर | आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात... पान ३ वर | तुकाराम मुंढे यांचे झेन झी ला... पान ४ वर

# ठेकेदार, अधिकारी आणि नगरसेवक यांच्या भ्रष्ट युतीमुळे पुणेकर नागरिकांना खड्डेमय रस्त्याला सामोरे जावे लागत आहे?

## ७५ कोटीचे पथ विभागाकडील काम होणार मग पावसाळ्यापुर्वी ६० ते ६८ कोटीच्या कामाचे काय?




### सामाजिक कार्यकर्ते आणि जागृत नागरिकांनी पुढे आलेच पाहिजे

शिवराय, फुले, शाहु, आंबेडकर विचार धारेवर काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते आणि पुणे महापालिकेमध्ये चुकीच्या पध्दतीने काम करणाऱ्या ठेकेदार, अधिकारी, नगरसेवक यांच्याविरोधात तक्रार अर्ज करणारे जागृत पुणेकर नागरिकांनी या वृत्ताची दखल घेवून आपापल्या क्षेत्रीय कार्यालयामध्ये पावसाळ्यापुर्वी लावण्यात आलेल्या या संपूर्ण कामाची माहिती घेवून ठेकेदार, अधिकारी आणि नगरसेवक यांच्या भ्रष्टाचाराची माहिती पुणे महापालिकेचे महापौर, महापालिका आयुक्त नवल किशोर राम आणि विरोधीपक्षनेते ॲड.निलेश निकमसह सर्व गटनेते यांच्यासमोर आणावे.

### पावसाळ्यापुर्वी लावण्यात आलेल्या कामाची श्वेतपत्रिका काढण्यात येणार का?

**पुणे** : पुणे शहरातील प्रमुख रस्ते आणि उपरस्ते, लहान-मोठे, सर्वच रस्त्यावर खड्डे पडल्याने नगरसेवक आपापल्या प्रभागाच्या माध्यमातून महापौर, आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त, यांना भेटून निवेदन देवून लक्ष वेढण्याचा मोठ्या प्रमाणात प्रयत्न करत आहेत. यामध्ये पुण्याचे महापौर आणि उपमहापौर हेही पाठिमागे राहिलेले नाही. यांनी आपापल्या प्रभागात भेटी देवून सोबत अधिकाऱ्याचा फौजफाटा आणून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनात स्थानिक गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे. यातून पुणे महापालिकेतील पथ विभाग आणि पथ विभागाचे प्रमुख यांच्यावर जो आरोपाचा वर्षाव होत आहे. तो पाहता याला जबाबदार पथ विभाग हे एकटेच विभाग आहे का? असा प्रश्न पडतो. कारण पावसाळी कामे ही पावसाळ्यापुर्वी लावण्यात आली आहे. यामध्ये १) क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील चेंबर्स समपातळीत करणे, आरसीसी चेंबर्स करणे, क्षेत्रीय कार्यालय निहाय मोबाईल मेंटेनन्स युनिटव्दारे देखभाल दुरूस्तीची कामे करणे व तदनुषंगिक इतर कामे करणे, २) क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यावर पाणीपुरवठा वाहिनी/मलनिस्सारण वाहिनी/गॅस वाहिनी/वीज वाहिनी तसेच केबल खोदाईचे रिइनस्टेटमेंन्ट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे (भाग-३), ३) क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यावर पाणीपुरवठा वाहिनी/मलनिस्सारण वाहिनी/गॅस वाहिनी/वीज वाहिनी तसेच तसेच केबल खोदाईचे रिइनस्टेटमेंन्ट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे (भाग-२), ४) क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यावर पाणीपुरवठा वाहिनी/मलनिस्सारण वाहिनी/गॅस वाहिनी/वीज वाहिनी तसेच तसेच केबल खोदाईचे रिइनस्टेटमेंन्ट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे (भाग-१), ५) क्षेत्रीय कार्यालयाचे अखत्यारीतील तसेच नव्याने समाविष्ट गावामधील नाला साफसफाई व तदनुषंगिक कामे करणे, ६) क्षेत्रीय कार्यालयाचे अखत्यारीतील नाला साफसफाई व तदनुषंगिक कामे करणे, ७) क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील पावसाळी गटारांची साफसफाई व तदनुषंगिक काम करणे. ही कामे पुणे शहरातील १५ क्षेत्रीय कार्यालयमध्ये लावण्यात आली आहे. या कामासाठी जवळ-जवळ ६० ते ६८ कोटी रूपये खर्ची टाकली आहे. यामध्ये रिइनस्टेटमेंन्टच्या कामाचा मोठ्या प्रमाणात भाग आहे. या सर्व कामाची 'अ' पाकीट 'ब' पाकीट ओपन होवून पावसाळा संपण्याची वेळ आली पण या कामाचे डॉक्येट मान्यतेसाठी आजही येतात काही प्रमाणात मान्यता देण्यातही आल्या आहेत. तर काही नुकत्याच झाल्या आहेत. पण या सर्व मान्यता दिलेल्या कामांना कित्येक नगरसेवकांनी आणि महापौरसह उपमहापौरांनी तसेच सभागृह नेते, स्थायी समिती अध्यक्ष आणि प्रभाग समिती अध्यक्ष यांनी आपापल्या प्रभागातील वरिलप्रमाणे लावलेल्या कामांची काय परिस्थिती आहे हे जाणून घेण्याचे काम केले आहे? असे दिसून येत नाही. कारण पुणे शहरातील प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात १) क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील चेंबर्स समपातळीत करणे, आरसीसी चेंबर्स करणे, क्षेत्रीय कार्यालय निहाय मोबाईल मेंटेनन्स युनिटव्दारे देखभाल दुरूस्तीची कामे करणे व तदनुषंगिक इतर कामे करणे, २) क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यावर पाणीपुरवठा वाहिनी/मलनिस्सारण वाहिनी/गॅस वाहिनी/वीज वाहिनी तसेच केबल खोदाईचे रिइनस्टेटमेंन्ट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे (भाग-३), ३) क्षेत्रीय कार्यालयाचे

(पान ३ वर)

## खड्ड्यांमुळे अपघात झाल्यास संबंधित विभागावर कारवाई – जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**पुणे** : चाकण एमआयडीसी परिसरातील राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पीएमआरडीए आणि एमआयडीसी यांच्या अखत्यारीतील सर्व रस्ते येत्या दि.२५ ऑगस्टपर्यंत खड्डेमुक्त करण्यात यावेत. त्यानंतर आपण प्रत्यक्ष पाहणी करणार असल्याचे सांगून निर्धारित मुदतीनंतर अतिक्रमणे काढली नाहीत, तर कार्यवाही होईल. तसेच रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघात झाल्यास संबंधित विभागाची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.



चाकण परिसरातील रस्त्यातील खड्डे, वाहतूक व्यवस्था, पावसाळ्यातील उपाययोजना तसेच नदी, नाल्यातील अतिक्रमणांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीत चाकण परिसरातील रस्त्यांच्या सद्य:स्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विशेषत: तळेगाव चौक, राणूबाईमळा, खराबवाडी, वाघजाई नगर,, खराबवाडी रोड, म्हाळुंगे इंगळे येथील सर्व चौक, खालुंब्रे येथील सर्व चौक, शिंदे वासुली येथील सर्व चौक, आंबेठाण वाय कॉर्नर, कोरेगाव फाटा तसेच बिरदवडी फाटा, दवने मळा ते द्वारका सिटी रोड, कॉर्निंग कंपनी ते राष्ट्रीय महामार्ग पुणे-नाशिक या ठिकाणी खराब झालेल्या रस्त्यांमुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत असून, अपघातांचा धोका वाढला असल्याची नोंद घेण्यात आली.

बैठकीस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक कार्यालयाचे अधीक्षक अभियंता नीलेश मोडवे, एमआयडीसीचे वरिष्ठ तांत्रिक सल्लागार संजयकुमार मांगीलवार, पीएमआरडीएचे शिवकुमार गोपाल, चाकण वाहतूक शाखेचे सहायक पोलिस आयुक्त गुलाब इनामदार, एमएसआरडीसीचे अधीक्षक अभियंता प्रवीण सुमंत उपस्थित होते.

या सर्व ठिकाणी तातडीने खड्डे बुजविणे, रस्त्यांची दुरूस्ती करणे, तसेच आवश्यक त्याठिकाणी सुरक्षा उपाययोजना राबविण्याबाबत संबंधित यंत्रणांना निर्देश देण्यात आले.

चाकण परिसरातील नदी, नाले तसेच सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमणे संबंधितांनी एका महिन्याच्या आत स्वखर्चाने काढून घ्यावीत. मुदत संपल्यानंतरही अतिक्रमणे कायम राहिल्यास प्रशासनामार्फत ती हटविण्याची कारवाई करण्यात येईल. अतिक्रमण हटविण्यासाठी येणारा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल. तसेच संबंधितांविरूध्द प्रचलित कायदे व नियमांनुसार कारवाईही करण्यात येईल. रस्ते दुरूस्तीची कामे युध्दपातळीवर हाती घेऊन सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावीत. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच प्राधान्य देत रस्त्यांवरील खड्डे आणि अतिक्रमाणांच्या प्रश्नावर कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही. असे जिल्हाधिकारी, जितेंद्र डुडी म्हणाले.

# संपादकीय...

## वाढीव वीजबिलासाठी नागरिकांनी रस्त्यावर यावे का?

महावितरण विभागाकडून मोठ्या प्रमाणात ग्राहकांना वाढीव वीजबिल देण्यात येत आहे. हे वाढीव विजबील ग्राहक महावितरण अधिकाऱ्याशी भेटतात तेव्हा त्यांना संबंधित कनिष्ठ कार्यालयात जावून व्हेरिफिकेश रिपोर्ट आणायला सांगतात किंवा सरसकट मीटर खराब झाला आहे. असे सांगून मीटर बदली करायला सांगतात. कनिष्ठ कार्यालयातून व्हेरिफिकेश रिपोर्ट दोन दिवसांनी मिळतो. तो रिपोर्ट घेवून विजबिल कमी करणाऱ्या अधिकाऱ्याकडे द्यावा लागतो. त्यानंतर पुन्हा दोन ते तीन दिवसांनी सुधारित विजबिल मिळते. याचे मुख्य कारण वाढीव विजबिल देताना त्या विजबिलावर चालू रिडिंग उपलब्ध नाही असा शेरा असतो. तसे पाहता महावितरण विभागाकडून प्रत्येक विजमीटरचे फोटो काढण्याचे आणि ते फोटो अपलोड करून संबंधित अधिकाऱ्याकडे सोपविण्याचे काम हे ठेकेदारी पध्दतीने केले जाते. यामध्ये बहुतांश चुका फोटो उपलब्ध नसल्यामुळे होतात. पण नागरिकांना किमान एक आठवडा या विजबिलासाठी महावितरण कार्यालयाचे पायऱ्या झिझवाव्या लागतात. त्यानंतर सुधारित बिल वेळेत न मिळाल्यास महावितरण अधिकाऱ्याकडून संबंधित नागरिकाच्या घराची विज प्रवाह कट केला जातो. आणि यासाठी वेगळा चार्ज द्यावा लागतो. एवढे सर्व करून जर मीटरच खराब आहे असे सांगितले जाते. त्यावेळी कित्येक ग्राहकांनी विजमीटर बदलल्यानंतरही विजबिल अव्वाच्या सव्वा दराने ग्राहकांना मिळाल्याने महावितरण विभागात मोठ्या प्रमाणात तक्रारीचा खच पडत आहे. यामध्ये प्रत्यक्षात वीज जोडणीच झालेली नसताना १५० युनिट वीज वापर झाल्याचे दाखवत महावितरणने ग्राहकाला वीजबिल पाठविल्याचा प्रकार हडपसरमध्ये समोर आला आहे. या घटनेमुळे महावितरणच्या बिलींग व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याची मागी होत आहे.

हडपसर येथील स्नेहा तोडकर यांनी सांगितले की, माझ्या घराचे बांधकाम अद्याप सुरू आहे. महावितरणने दोन दिवसांपूर्वी वीज मीटर दिला. मात्र, मीटरची वीज जोडणी अद्याप झालेली नाही. असे असातनाही महावितरण कार्यालयांकडून मला १५० युनिट वापर झाल्याचे विजबील देण्यात आले. प्रत्यक्षात वीजच वापरलेली नसताना हे बिल कोणत्या आधारावर तयार करण्यात आले? या संपूर्ण प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. काल पुन्हा बिल भरण्यासाठी फोन आल्याचेही त्यांनी सांगितले.

याबाबत या संदर्भात महावितरणशी संपर्क साधण्याचा प्रयत्न झाला; मात्र प्रतिसाद मिळू शकला नाही. त्यामुळे तोडकर यांनी महावितरणच्या ऑनलाइन पोर्टलवर अधिकृत तक्रारही दाखल करून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, चुकीचे वीजबिल तत्काळ रद्द करावे आणि भविष्यात नागरिकांना अशा त्रासाला सामोरे जावे लागू नये, यासाठी महावितरणने बिलींग व्यवस्थेतील त्रुटी दूर कराव्यात, अशी मागणी केली आहे.

वीज जोडी नसताना वीज वापर दाखवून बिल पाठविले ही केवळ तांत्रिक चूक नसून ग्राहकांच्या विश्वासला तडा देणारी बाब असल्याची भावना व्यक्त होत आहे. महावितरणचा हा भोंगळ कारभार नेमका कधी थांबणार? निष्काळजीपणासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणार की पुन्हा एकदा चौकशीच्या नावाखाली प्रकरण दडपले जाणार? असा संतप्त सवाल आता हडपसरमधील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

तसेच आंबेगाव परिसरातील एका ग्राहकाला दरमहा सुमारे ६०० रूपये येणारे वीजबिल तब्बल १० हजार ८०० रूपये आल्याची घटना समोर आली आहे. त्यामुळे स्मार्ट मीटरच्या अचूकतेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

आंबेगाव येथील लेक व्हिस्टा सोसायटीतील रहिवासी सनी काटकर यांनी सांगितले की, २२ जुलै रोजी त्यांच्या मीटरचे रिडिंग १३५१ होते, तर ३ ऑगस्ट रोजी ते १९६७ झाले, अवघ्या १२ दिवसांत ६१६ युनिट वीज वापर झाल्याची नोंद मीटरमध्ये दिसून आली. त्यामुळे नेहमीच्या तुलनेत अनेक पटींनी अधिक वीजबील आल्याने त्यांनी महावितरणकउे तक्रार केली. विशेष म्हणजे, मीटरमध्ये बिघाड असल्याची तक्रार केल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रथम संपूर्ण बील भरण्यास सांगण्यात आले. त्यानंतर मीटर नादुरूस्त असल्याचे सांगून तो बदलण्याची सूचना करण्यात आली. माझे दरमहा सुमारे ६०० रूपये वीजबील येत होते. मात्र यावेळी वीजपुरवठा बंद असतानाही मीटरमध्ये स्मार्ट मीटरच्या अचूकतेबाबत गंभीर शंका निर्माण झाली असून, ग्राहकांच्या तक्रारीची निष्पक्ष चौकशी होण आवश्यक आहे. असे ग्राहक सनी काटकर यांचे प्रकरण समोर आले आहे. यापध्दतीने राज्यभरात स्मार्ट वीज मीटरमुळे वाढीव वीजबिलांच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. महावितरण विभागाने वेळीच योग्य तो विजमीटर बसवावा. अन्यथा सर्वसामान्य नागरिक वाढीव वीज बिलासंदर्भात रस्त्यावर आल्यावाचून राहणार नाही. हे मात्र नक्की.

साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक - यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग - सी - २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे - ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

**आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात**

Email : sangharshachaaawaz22@gmail.com

Email : sangharshachaaawaz@rediffmail.com

Mob. : 7276871008 / 9665487134



**मागील अंकावरून**

६) त्याच्याबरोबर लग्नासाठी त्याला कोणतीही स्त्री पसंत करित नाही कारण तो तिाा योग्यप्रकारे उदरनिर्वाह करू शकत नाही.

ड) हे तरूण गृहस्था, हे सहा दुष्परिणाम आळसी लोकामध्ये असतात. तो कोणतेही काम करित नाही. तो काम न करण्याची अशी कारणे देतो.

१) आज खूप थंडी आहे.

२) आज अत्यंत उष्णता आहे.

३) आज रात्र झालीय, खूप उशीर झाला आहे.

४) सूर्य उक्षवायला बराच अवधी आहे खूपच लवकर का उठावे.

५) मला आता बरीच भूक लागली आहे.

६) अधिक जेवल्यामुळे थोडी वामकुक्षी घ्यावी.

अशाप्रकारे अनेक कारणे सांगून तो कोणतेही काम करित नाही. नविन धन मिळवित नाही. अशामुळे जी धूसंपत्ती आहे ती तो हळू हळू घालवून बसतो.

भगवान बुध्दांनी हे सांगितल्यावर ते पुन्हा म्हणाले कांही खाण्यापिण्याचे दोस्त असतात जो पर्यंत तुझ्याकडून कांही तरी मिळते तोपर्यंतच तुला तुझ्यासमोर मित्र-म्हणतील; ते सर्व लाभार्थी आहेत.

सूर्योदयापर्यंत झोपने, पती अुवा पत्नीचा विश्वासघात करणे, रागीट स्वभाव,

**क्रमश:**

## सिगोलवाद सुत्त

**मला उपलब्ध वाङमयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरूवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.**

**जयभीम!**

**उत्तमराव सोनवणे**

## ९ ऑगस्ट क्रांती दिनाच्या पूर्व संध्येला 'क्रांतीज्योत' यात्रा काढून पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शहिदांना अभिवादन

**पुणे :** ९ ऑगस्ट क्रांती दिनाच्या पूर्व संध्येला पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी व पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस भवन ते हुतात्मा कर्णिक स्मारक, फरासखाना पर्यंत 'भारत माता की जय', 'वंदे मातरम' चा जयघोष करीत 'क्रांतीज्योत यात्रा' काढून शहिदांना अभिवादन करण्यात आले.



क्रांतीज्योत यात्रेचा हुतात्मा कर्णिक स्मारकास पुष्पहार अर्पण करून समारोप करण्यात आला. यावेळी समारोपीय भाषणात दीप्ती चवधरी म्हणाल्या की, ''भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये काँग्रेस पक्षाचे अमूल्य योगदान आहे. महात्मा गांधी यांनी ब्रिटीश सरकारला 'चले जाव' चा नारा दिला आणि देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी हजारो क्रांतीकारकांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. त्यांचे स्मरण करण्यासाठी काँग्रेस पक्षातर्फे दरवर्षी ऑगस्ट क्रांती दिनाच्या पूर्व संध्येला मशाल यात्रा काढण्यात येते. सध्या देशात अराजकता माजली असताना काँग्रेस पक्ष देशातील लोकशाही व संविधानाचे रक्षण करण्यासाठी अशाच पध्दतीने क्रांतीकारी लढा देत आहे.''

यानंतर प्रशांत जगताप म्हणाले की, ''देशातील समता, बंधुता, स्वातंत्र्य आणि न्याय टिकवून ठेवण्याची महत्वाची जबाबदारी काँग्रेस पक्षावर आहे. केंद्रातील सत्तारूढ सरकार सामान्य नागरिकांच्या हक्कांची पायमल्ली करीत असताना स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतीकारकांचे स्मरण करीत लोकशाहीच्या रक्षणासाठी दुसरा लढा उभारणे आवश्यक आहे. मशाल यात्रेच्या माध्यमातून स्वातंत्र्य लढ्यात शहिद झालेल्यांचे स्मरण केले जात आहे.'' यावेळी पुणे मनपातील काँग्रेस पक्षाचे गटनेते चंदूशेठ कदम, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते गोपाळ तिवारी, सरचिटणीस सुनिल मलके, शहर काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष कैलास गायकवाड, खजिनदार चंद्रशेखर कपोते, उपाध्यक्ष राजाभाऊ कदम, मधुकर राऊत, नगरसेवक रफिक शेख, साहिल केदारी, विशाल मलके, सुनिल शिंदे, सुमय्या नदाफ, वैशाली भालेराव, डॉ.स्नेहल पाडळे, जयाशेठ किराड, राजेंद्र भुतडा, मुनाफ शेख, नुरूद्दीन सोमजी, ॲड. रमेश पवळे, महिला अध्यक्षा स्वाती शिंदे, सेवादलाचे लतेंद्र भिंगारे, युवक अध्यक्ष सौरभ अमराळे, इंटक अध्यक्ष चेतन आगरवाल, बाळासाहेब अमराळे, सचिन आडेकर, उस्मान तांबोळी, श्रीकृष्ण बराटे, चैतन्य पुरंदरे, सोशल मिडीया अध्यक्ष गुलाम हुसेन खान, सुरेश कांबळे, जीवन चाकणकर, युवराज मदगे, द.स.पोळेकर, निलेश बोराटे, अस्लम बागवान, हर्षद हांडे, प्रवीण करपे, अमित कांबळे, अंजली सोलापूरे, अनुसया गायकवाड, रमेश सकट, रविंद्र माझिरे, रमेश सोनकांबळे, विक्रम खन्ना, संजय मोरे, फैय्याज शेख, गणेश जाधव, दिलीप लोळगे, अजय खुडे, राहुल वंजारी, विक्रम शहाणे, सुरेश नांगरे, किशोर मारणे, चेतन पडवळ, संतोष सुपेकर, सईद शेख, नरसिंह आंदोली आदींसह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जन्म-मृत्यू दाखल्यांसाठी ३४.३५ लाखांचे वॉटरमार्क पेपर खरेदी प्रस्तावाला मान्यता

**पुणे :** पुणे महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांतील जन्म-मृत्यू नोंदणी विभागासाठी जन्म व मृत्यू दाखल्यांसाठी वापरण्यात येणाऱ्या महापालिकेच्या बोधचिन्हासह वॉटरमार्क पेपर खरेदी करण्यासाठी ३४ लाख ३५ हजार रुपयांचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाला मान्यता दिल्याचे स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले. या खरेदीसाठी 'मे. नमन एंटरप्रायझेस, पुणे' यांचा सर्वात कमी दर आल्याने त्यांच्याकडून जीईएम पोर्टलच्या कार्यपद्धतीनुसार खरेदी करण्याची शिफारस प्रशासनाने केली आहे.

महापालिकेच्या मध्यवर्ती भांडार कार्यालयामार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ही निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. जन्म-मृत्यू नोंदणी विभागाकडून प्राप्त झालेल्या मागणीनुसार अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांच्या प्रशासकीय मान्यतेनंतर खरेदी उच्चाधिकार समितीमार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्रशासनाच्या प्रस्तावानुसार १५ लाख नग ए-४ आकाराचे, १०० जीएसएम दर्जाचे, महापालिकेच्या लोगोची एकरंगी छपाई असलेले वॉटरमार्क पेपर खरेदी करण्यात येणार आहेत. या कागदासाठी बिंदल, टीएनपीएल किंवा जेके या उत्पादक कंपन्यांचा कागद वापरण्याची अट ठेवण्यात आली आहे. सदर निविदेतील दर बाजारभावाशी सुसंगत असल्याचे प्रशासनाने नमूद केले असून या खर्चासाठी सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात आवश्यक निधी उपलब्ध असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. वित्तीय समिती तसेच खरेदी उच्चाधिकार समितीने या प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर अंतिम मंजुरीसाठी विषय स्थायी समितीपुढे ठेवण्यात आला होता.

# आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात आंबेडकरी-बहुजन नागरिकांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा

**पुणे** : भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जाती समूहाला प्रदान केलेल आरक्षण हे कोणाची दया, कृपा किंवा सवलत नसून, शतकानुशतके झालेल्या सामाजिक अन्यायाची घटनात्मक भरपाई आहे.

सध्या अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये (अ,ब,क,ड) उपवर्गीकरण करण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यामुळे समाजात विभागणी होण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर अनुसूचित जातींच्या घटनात्मक हक्कांचे संरक्षण, सामाजिक न्यायाची भूमिका दृढ करणे आणि शासनामार्फत आपल्या न्याय्य मागण्या पोहोचविण्यासाठी संविधानिक व शांततापूर्ण महामोर्चाचे आयोजन करून आंबेडकरी-बहुजन नागरिकांच्या वतीने शनिवार, दि.८ ऑगस्ट २०२६, सकाळी ११.०० वाजता जुना बाजार चौक, मंगळवार पेठ, पुणे ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा, जिल्हाधिकारी कार्यालय, विराट मोर्चा काढून पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. मोर्चाच्या समारोप प्रसंगी पुणे जिल्हाधिकारी चौकात झालेल्या सभेत रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर, खासदार चंद्रकांत हांडोरे, आमदार बाबुराव माने, अमन आंबेडकर, चंद्रग्रहण आंदोरे आदींनी उपस्थितांना मार्गदर्शन केले तर मोर्चाचे समन्वयक सतिश गायकवाड, विवेक बनसोडे, सर्जेराव वाघमारे, युवराज बनसोडे, नितीन कांबळे, महाराष्ट्र भूषण बाळासाहेब चव्हाण, फिरोज मुल्ला, विजय चव्हाण, किशोर कांबळे, स्वातीताई गायकवाड, संजु बनसोड, सुखदेव सोनवणे, महानंदाताई डाळिंबे, नगरसेवक निलेश आल्हाट आदींनी नियोजन केले.






भारतीय संविधानाने अनुसूचित जातीना दिलेले आरक्षण हे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण दूर करण्यासाठी आणि समतेची मूल्ये रूजवण्यासाठी आहे. अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण केल्यास समाजात आपापसांत तेढ निर्माण होऊन संविधानिक हक्कांवर विपरित परिणाम होऊ शकतो आणि समाजात फूट पडू शकते, अशी भीती यावेळी व्यक्त करण्यात आली. त्यामुळे ही उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ थांबवण्यात यावी, सर्वोच्च न्यायालयाच्या संविधानविरोधी उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात तातडीने विशेष अधिवेशन बोलवून वटहुकूम काढावा, न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल तात्काळ सार्वजनिक करण्यात यावा, शासकीय सेवांमधील अनुसूचित जातींसाठी राखीव असलेली सर्व अनुशेष पदे विशेष भरतीव्दारे तातडीने भरावी, देशभरात जातनिहाय जनगणना तातडीने करण्यात यावी. अशी प्रमुख मागणी समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

# ठेकेदार, अधिकारी आणि नगरसेवक यांच्या भ्रष्ट युतीमुळे पुणेकर नागरिकांना खड्डेमय रस्त्याला सामोरे जावे ...

**(पान १ वरून)** कार्यक्षेत्रात विविध रस्त्यावर पाणीपुरवठा वाहिनी/मननिस्सारण वाहिनी/गॅस वाहिनी/वीज वाहिनी तसेच तसेच केबल खोदाईचे रिइनस्टेटमेंन्ट करणे तसेच इतर तद्नुषंगिक कामे करणे (भाग-२), ४) क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यावर पाणीपुरवठा वाहिनी/मननिस्सारण वाहिनी/गॅस वाहिनी/वीज वाहिनी तसेच तसेच केबल खोदाईचे रिइनस्टेटमेंन्ट करणे तसेच इतर तद्नुषंगिक कामे करणे (भाग-१), ५) क्षेत्रीय कार्यालयाचे अखत्यारीतील तसेच नव्याने समाविष्ट गावामधील नाला साफसफाई व तद्नुषंगिक कामे करणे, ६) क्षेत्रीय कार्यालयाचे अखत्यारीतील नाला साफसफाई व तद्नुषंगिक कामे करणे, ७) क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील पावसाळी गटारांची साफसफाई व तद्नुषंगिक काम करणे. या पध्दतीचे कामे न करताच किंवा दिखावा करण्यापुरते काम करून संपूर्ण बिल काढल्या जात आहे? याची या माननीयांनी चौकशी न करण्यामागे नक्की काय कारण असू शकते. हा संशोधनाचा विषय आहे? या कामाचे जवळ-जवळ ८० ते ९० टक्के काम झाले आहे असे सांगतात. मग पुणे शहरात एवढे खड्डे कसे काय पडले. याची साधी विचारनाही कोणत्याही नगरसेवकांनी केली नाही? कारण याच कामाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रस्त्यावरील खड्डे आणि जमा होणारे पाणी याची सर्व कामे पावसाळ्यापुर्वी करण्यात येणाऱ्या कामामध्ये समाविष्ट आहे. तरीही पुणे शहराची ही परिस्थिती आहे. असे दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आणि दाखविण्यात सर्वच माननीय, नगरसेवक, आमदार यशस्वी झाले असेच म्हणावे लागेल. कारण याच खड्ड्यामुळे पथ विभागाकडून दि.३ जुलै २०२६ रोजी २५ कोटीचे एकूण ३ निविदा काढण्यात आल्या. एकूण ७५ कोटीच्या निविदा काढण्यात आल्या. यामध्ये पथ विभागाकडील क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील पुणे मनपाच्या विविध खात्यानी भुमीगत सेवा वाहिन्या टाकणेकरिता केलेल्या रस्त्याचे, खड्ड्याचे ''रिइनस्टेटमेंन्ट करणे तसेच तद्नुषंगिक कामे करणे'' असे आहे. आणि या निविदाची ओपनिंग दिनांक १३ जुलै २०२६ होती. त्यातच ज्या ठेकेदाराची प्रतितास १२० टन हॉटमिक्स डांबर तयार करण्याची क्षमता नाही, अशा ठेकेदाराला काम देण्याचा प्रयत्न सुरू आहे.

प्रत्यक्षात त्या ठेकेदारांची प्रति तास ९० टन हॉटमिक्स डांबर तयार करण्याची क्षमता आहे. या क्षमता नसलेल्या मर्जीतील ठेकेदाराला पात्र करण्यासाठी अधिकाऱ्यांचा खटाटोप सुरू आहे. त्यामुळे ७५ कोटींच्या निविदांची कामे ठप्प झाली आहेत.

शहरात वेगवेगळ्या ठिकाणी पाणीपुरवठा, ड्रेनेज, विद्युत वाहिन्यांसह विविध कामांसाठी ऐन पावसाळ्यात ठिकठिकाणी खोदाईची कामे सुरू होती. खोदाई करण्यात आलेले रस्ते, पदपथ व्यवस्थित दुरूस्त करण्यात आले नाहीत. परिणामी शहरातील मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांवर देखील मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. संबंधित खड्ड्यांमुळे शहरातील वाहतुकीचा वेग प्रचंड मंदावला असल्याची सद्यस्थिती आहे. दुचाकीस्वारांना वाहने चालविताना अक्षरशः जीव मुठीत घेऊन जावे लागत आहे. त्यातच गेल्या वर्षभरात विविध कारणासाठी सुमारे ८५ किलोमीटर रस्त्यांची खोदाई झाली आहे. हे खोदलेले रस्ते रिस्टेंटमेंट न केल्याने शहरात खड्ड्यांचे साम्राज्ये निर्माण झाले आहे. या रस्त्यांचे रिस्टेटमेंट करण्यासाठी महापालिकेने पथ विभागाच्या तीन अधीक्षक अभियंत्यांच्या नियंत्रणाखाली प्रत्येकी २५ कोटी रूपये याप्रमाणे ७५ कोटी रूपयांच्या निविदा काढल्या आहेत. यातील प्रत्येक निविदेसाठी ७ ते ८ ठेकेदारांनी त्यांचे प्रस्ताव दाखल केले आहेत. त्यात अ पाकीट उघडून कागदपत्रांची छाननी सुरू केली आहे. या निविदेमध्ये ठेकदाराचा पुणे महापालिकेपासून शहराच्या ३५ किलोमीटर अंतराच्या आत हॉटमिक्स प्लांट असणे अनवार्य आहे. या प्लांटमधून प्रति तास १२० टन हॉटमिक्स डांबर तयार होण आवश्यक आहे. त्यासह ठेकेदाराची आर्थिक क्षमता, वार्षिक उलाढाल किती आवश्यक आहे. असा नियम व अटी टाकण्यात आलेल्या आहेत. तर प्रति तास १२० टन हॉटमिक्स डांबर तयार करण्याची क्षमता नसताना पात्र कसे केले. या प्रकणात केवळ निविदा तपासणारे आणि मंजुरी देणारे अधिकारी यांची देखील भूमिका निष्पक्षपणे तपासली जाणे आवश्यक आहे. जर चौकशीत कोणत्याही अधिकाऱ्यांचे संगनमत किंवा निष्काळजीपणा आढळला, तर त्यांच्यावरही कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते उज्वल केसकर, सुहास कुलकर्णी, माजी नगरसेवक प्रशांत बधे यांनी केली आहे. मुळात पावसाळ्यापुर्वी पुणे शहरातील १५ क्षेत्रीय कार्यालयाच्या माध्यमातून लावण्यात आलेली कामे १) क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील चेंबर्स समपातळीत करणे, आरसीसी चेंबर्स करणे, क्षेत्रीय कार्यालय निहाय मोबाईल मेंटेनन्स युनिटव्दारे देखभाल दुरूस्तीची कामे करणे व तद्नुषंगिक इतर कामे करणे, २) क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यावर पाणीपुरवठा वाहिनी/मलनिस्सारण वाहिनी/गॅस वाहिनी/वीज वाहिनी तसेच केबल खोदाईचे रिइनस्टेटमेंन्ट करणे तसेच इतर तद्नुषंगिक कामे करणे (भाग-३), ३) क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यावर पाणीपुरवठा वाहिनी/मननिस्सारण वाहिनी/गॅस वाहिनी/वीज वाहिनी तसेच तसेच केबल खोदाईचे रिइनस्टेटमेंन्ट करणे तसेच इतर तद्नुषंगिक कामे करणे (भाग-२), ४) क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यावर पाणीपुरवठा वाहिनी/मननिस्सारण वाहिनी/गॅस वाहिनी/वीज वाहिनी तसेच तसेच केबल खोदाईचे रिइनस्टेटमेंन्ट करणे तसेच इतर तद्नुषंगिक कामे करणे (भाग-१), ५) क्षेत्रीय कार्यालयाचे अखत्यारीतील तसेच नव्याने समाविष्ट गावामधील नाला साफसफाई व तद्नुषंगिक कामे करणे, ६) क्षेत्रीय कार्यालयाचे अखत्यारीतील नाला साफसफाई व तद्नुषंगिक कामे करणे, ७) क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील पावसाळी गटारांची साफसफाई व तद्नुषंगिक काम करणे. ही ठेकेदाराने व्यवस्थीत नियमानुसार केली आहे का म्हणून अधिकारी आणि नगरसेवकांनी याची माहिती घेतली असल्यास पुणेकर नागरिकावर खड्ड्यामध्ये वाहन चालवून हाडे खिळखिळी होण्याची वेळ आली नसती. **पुणे महापालिकेतील पथ विभागातून काढण्यात आलेल्या ७५ कोटीच्या निविदाची कामे होतील. पण १५ क्षेत्रीय कार्यालय स्तरावरील पावसाळ्यापुर्वी काढण्यात आलेल्या ६० ते ६८ कोटीच्या कामाची गुणवत्ता आणि त्याच्या अहवालाचे काय हा प्रश्नच आहे.**

# अधिकाऱ्यांनी रस्त्यावर उतरून खड्ड्यांची पाहणी करावी; श्रीनाथ भिमाले यांचे निर्देश

**पुणे** : शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांची केवळ तक्रारींची वाट न पाहता संबंधित अधिकारी आणि अभियंत्यांनी स्वतः रस्त्यावर उतरून प्रत्यक्ष पाहणी करावी. धोकादायक खड्ड्यांची तातडीने नोंद करून पाऊस थांबताच कायमस्वरूपी दुरुस्ती करावी. तसेच खड्डे दुरुस्तीच्या कामांच्या गुणवत्तेवर विशेष लक्ष ठेवून निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करावी, असे निर्देश स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी गुरूवारच्या बैठकीत प्रशासनाला दिले. बैठकीत शहरातील प्रमुख



आणि अंतर्गत रस्त्यांवरील खड्ड्यांच्या समस्येचा आढावा घेण्यात आला. अनेक ठिकाणी दुरुस्ती झाल्यानंतर काही दिवसांतच पुन्हा खड्डे पडत असल्याने कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाने आपल्या हद्दीतील रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून खड्ड्यांचा अहवाल सादर करावा आणि त्याचा नियमित आढावा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घ्यावा, असे निर्देश देण्यात आले. ते पुढे म्हणाले, नागरिकांना वाहतुकीचा त्रास होऊ नये, अपघात टळावेत आणि शहरातील रस्ते सुरक्षित राहावेत, ही प्रशासनाची जबाबदारी आहे. पावसाळा संपताच कायमस्वरूपी दुरुस्तीची कामे पूर्ण करावीत. केवळ कागदोपत्री अहवाल न देता अधिकारी आणि कर्मचारी यांनी प्रत्यक्ष रस्त्यावर जाऊन परिस्थितीची खात्री करावी.

# तुकाराम मुंढे यांचे 'जेन झी'ला आवाहन; बदल हा प्रगतीचा अविभाज्य भाग

## स्वत:चे व्हिजन ठेवा, सद्विवेकाला फॉलो करा!




**पुणे :** 'प्रत्येक तरुणाने स्वत:ची स्वप्ने, सद्विवेक आणि अंतरात्म्याला 'फॉलो' केले पाहिजे. केवळ प्रवाहासमवेत न वाहता समाजात सकारात्मक बदल घडविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत,' अशा प्रेरक शब्दांत अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी 'जेन झी' पिढीला 'बी युवरसेल्फ'चा मंत्र दिला. 'वारंवार होणाऱ्या बदल्यांमुळे मला त्रास होत नाही. उलट बदल हा प्रगतीचा अविभाज्य भाग असून, माझ्या जितक्या जास्त बदल्या होतील, तितके अधिक सकारात्मक बदल घडतील,' अशी रोखठोक भूमिकाही त्यांनी मांडली.

'पुणे लोकल' आणि 'माय जनसेवक' यांच्या संयुक्त विद्यमाने बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित 'भविष्यवेध - संवाद भविष्याचा' या उपक्रमांतर्गत 'अनस्टॉपेबल तुकाराम' या विशेष मुलाखत कार्यक्रमात ते बोलत होते. प्रसिद्ध लेखक अरविंद जगताप आणि वरिष्ठ पत्रकार प्रशांत आहेर यांनी मुंढे यांची मुलाखत घेतली. तुकाराम मुंढे यांचे वरिष्ठ बंधू अशोक मुंढे, विश्वेश्वर बँकेचे अध्यक्ष सुनील गाडवे, वी फाऊंडेशनच्या शामला देसाई, आम्रपाली चव्हाण, दिनेश कदम आदी उपस्थित होते. या प्रसंगी त्यांनी आपल्या बालपणापासूनचा खडतर प्रवास, यूपीएससीतील अपयश आणि यश, प्रशासकीय कारकीर्दीतील कठोर निर्णय आणि अन्न सुरक्षेशी संबंधित धोरणांवर मनमोकळे भाष्य केले.

'बीए झाल्यानंतर एमए राज्यशास्त्र प्रवेशासाठी मी पहिल्यांदाच 'लालपरी' एसटीने पुण्यात आलो होतो. शिवाजीनगर बसस्थानकावरून पुणे विद्यापीठात पायी गेलो. प्रवेश मिळत होता, परंतु वसतिगृह उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्या सायंकाळी मला निराश होऊन परत जावे लागले. नंतर यूपीएससीच्या तयारीदरम्यान जयकर ग्रंथालय आणि रानडे इन्स्टिट्यूटच्या ग्रंथालयात अभ्यास केला. मित्राच्या खोलीवर 'पॅरासाईट' म्हणून राहताना ढेकणांमुळे रात्र-रात्र झोप यायची नाही. त्या काळात चायनीज गाड्यांवर मी आयुष्यात पहिल्यांदा चायनीज खाल्ले होते. छत्रपती संभाजीनगरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात 'एमए' करताना परिस्थितीमुळे ऑम्लेट-पाव आणि फरसाण-केळी हेच 'स्टेपल डाएट' होते. आता मी ते 'स्ट्रीटफूड' खाल्ले तर माझा घसा बसेल,' अशी आठवण सांगताच सभागृहात एकच हशा पिकला.

यूपीएससीच्या खडतर प्रवासाबाबत सांगताना ते म्हणाले, 'फक्त यशाकडे पाहू नका, त्यामागील संघर्षाकडेही पाहा. मला दोन वेळा केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत अपयश आले. तरीही खचून न जाता 'पीएचडी' सुरू केली, नेट परीक्षा उत्तीर्ण झालो, कॉलेजमध्ये तासिका तत्त्वावर प्राध्यापक म्हणून काम केले, 'एमपीएससी' परीक्षेत उत्तीर्ण झालो. त्यानंतरही 'यूपीएससी'ची तयारी सुरूच ठेवली. ११ मे २००५ रोजी मी यशदामध्ये विपश्यना करत असताना फोन आला की, 'तुमचे देशात २० व्या रँकने सिलेक्शन झाले आहे.' तो क्षण ऐकून माझा श्वास काही मिनिटांसाठी थांबला होता. या यशामागे मोठा संघर्ष होता.'

अन्न व औषध प्रशासनाच्या कारवायांबाबत बोलताना त्यांनी खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड खपवून न घेण्याची सडेतोड भूमिका मांडली. 'भेसळयुक्त अन्न, विषारी ताडी-दारू आणि निकृष्ट अन्नपदार्थ नागरिकांच्या आरोग्याशी खेळत आहेत. 'एफडीए'ने तक्रारींसाठी टोल-फ्री क्रमांक सुरू केला असून नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. हायकोर्टाच्या कँटीनपासून ते शासकीय कार्यालयांपर्यंत सर्वत्र नियमानुसारच तपासणी सुरू आहे. अन्न उद्योगाने नियमांचे पालन करणे, एफडीएने नियमन करणे आणि ग्राहकांनी सजग राहणे यातूनच ही व्यवस्था बदलेल.'

तरुणाईला मार्गदर्शन करताना मुंढे म्हणाले, 'कोणाचे अंधानुकरण करू नका, तर प्रत्येकाकडून चांगले गुण शिका आणि स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करा. डिजिटल युगात तरुण पिढीचा 'अटेंशन स्पॅन' अवघ्या आठ सेकंदाचा झाला आहे आणि स्क्रीन टाइम ८-९ तासांवर गेला आहे. त्यामुळे केवळ सोशल मीडियावर रील्स स्क्रोल करू नका, तर विचार करा. कष्टाची तयारी ठेवून स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करा. प्रवाहातील लाकडाच्या ओंडक्याप्रमाणे वाहून न जाता जिवंत माणसाप्रमाणे ध्येयाकडे वाटचाल करा. परिस्थिती कशीही असली, तरी तुमचे भविष्य हे तुम्ही आज घेतलेल्या निर्णयांवरच अवलंबून असते.'

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात अरविंद जगताप यांनी तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय प्रवासावर आणि व्यक्तिमत्त्वावर लिहिलेल्या विशेष पत्राचे भावनिक वाचन केले. मिलिंद कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. अशोक मुंढे आणि अमित रुके यांनी मनोगत व्यक्त केले. विरेश आंधळकर यांनी प्रास्ताविक व आभार प्रदर्शन केले.

बीयर आणू का?' या प्रश्नाने दिल्ली सोडली

यूपीएससी'च्या तयारीदरम्यान १९९६ मध्ये पहिल्यांदा दिल्लीला गेल्याचा किस्साही त्यांनी सांगितला. 'दिल्लीतील जवाहर बुक डेपोमधून पुस्तके घेतल्यानंतर पहाडगंजमधील एका हॉटेलमध्ये थांबलो होतो. त्या वेळी वेटरने 'बीयर आणू का?' असे विचारताच मला संताप आला. मी तातडीने बॅग पॅक केली आणि रेल्वे स्थानक गाठले. तिकीट नसतानाही कर्नाटक एक्स्प्रेसचे जनरल तिकीट काढून टॉयलेटजवळ बसत भुसावळपर्यंत प्रवास केला आणि तेथून बसने संभाजीनगर गाठले,' असे त्यांनी सांगताच सभागृहाने टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

शाळेतच पहिला 'बदली'चा अर्ज

तुकाराम मुंढे यांच्या बदलीच्या प्रतिमेशी जोडलेला एक रंजक किस्साही यावेळी समोर आला. 'ताडसुर्णा गावातील शाळेत आठवीत असताना भूगोलाचा एकही धडा शिकविला जात नसल्याची तक्रार आम्ही शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांकडे केली होती. 'आम्हाला या शिक्षकाची बदली पाहिजे,' असा 'आदेश' असे लिहिलेला अर्ज आपण केला होता आणि त्यानंतर त्या शिक्षकाची बदलीही झाली,' अशी आठवण त्यांनी सांगितली.

कोणत्याही व्यक्तीपेक्षा व्यवस्था महत्त्वाची आहे. व्यवस्थेने नियमांनुसार काम केले पाहिजे. अधिकारी येतील-जातील; मात्र व्यवस्था व्यवस्थित चालण्यासाठी उत्तरदायित्व आणि कार्यपद्धतीची संस्कृती विकसित झाली पाहिजे. त्यामध्ये सरकारी कर्मचाऱ्यांसमवेत नागरिकांचेही योगदान महत्त्वाचे आहे. असे तुकाराम मुंढे, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग यांनी सांगितले.

# शिका-संघटन करा आणि संघर्षातून आदिवासींचा विकास करा-नितिन चंदनशिवे (कवि, दंगलकार)




**पुणे/गुरव पिंपळे :** आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र पुणे यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार - २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कवी, दंगलकार नितीन चंदनशिवे होते. यावेळी पुणे व पुणे ग्रामीण अशा विविध भागातील इयत्ता १० वि, १२ वि, पदवी ,इंजिनीरिंग आणि वैद्यकीय क्षेत्रातील युवक - युवती मोठ्या प्रमाणात हजर होते.

चंदनशिवे म्हणाले की, आदिवासींचा इतिहास उज्ज्वल असून भारत स्वतंत्र होण्यापूर्वी आदिवासी क्रांतिकारकांनी प्रथम इंग्रजां विरोधी लढा दिला होता, दुर्दैवाने त्यांचा इतिहास लिहिला गेला नाही. आता तो आपल्या गुणवंताच्या हातात आहे, त्याचे नव्याने लेखन करा, शहरात आदिवासी संस्कृती एव्हढी दिसून येत नाही, ती नंदुरबार, गडचिरोली, पालघर तथा महाराष्ट्राच्या बाहेर छत्तीसगड, ओडिसा, झारखंड या राज्यात अधिक आहे. ती येथिल समुदायाने अभ्यासावी.

जल, जंगल आणि जमीन हि आदिवासींची जगण्याची, नव्हे अस्तित्वाची ओळख असून ती पुसण्याची भिती असून यासाठी आदिवासी समाजाने जागरूक होणे हि काळाची गरज आहे, हे भाग्य आजच्या तरुण पिढीकडे चालून येत असल्याने आपण हा समृद्ध वारसा जतन करावा. आपण त्यासाठी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे. त्यासाठी संविधानाने आदिवासींसाठी भरपूर तरतुदी केल्या असून त्याचा लाभ घ्यावा. चालू परिस्थिती आणि घडामोडी पाहता संविधान धोक्यात असल्याचे जाणवत असून ते पायदळी तुडवण्याच्या प्रवृत्ती समाजात फोपावत आहेत, परंतु कुठल्याही कठीण काळात संविधान सांभाळणे हि काळाची गरज आहे. हि परिस्थिती त्यांनी त्यांच्या कांबळे नाही रडला, नुसताच कन्हला. उं..

या कवितेतून समर्पकपणे मांडली. कांबळे कुण्या जाती - पातीचा, धर्माचा नसून तो भारतमातेचा - संविधान जपनेसाठी धडपडणारा एक माणूस आहे असे म्हणाले.

मा.सुधाकर तेलंग (भा.प्र.से) जनसेवा लोकहक्क आयुक्त, पुणे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीने यशाची शिखरे पादाक्रांत करावी, त्यासाठी खूप हुशार असण्याची आवश्यकता नाही, परंतु जिद्द आणि सातत्य राखल्यास स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊ शकता असा आशावाद स्वतःच्या यशातून घालून दिला.

नामदेव गंभिरे, आदिवासी समाज कृती समिती, पुणे यांनी आपल्या प्रस्थाविकात समाजात आज भेडसावणाऱ्या समस्यांचा आढावा घेऊन आदिवासी समाजातील तरुणांनी, नोकरदारांनी व राजकीय नेत्यांनी या प्रश्नांबाबत जागरूक राहून समाजाचं नेतृत्व करून या समस्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा. त्यासाठी त्यांनी कृती समित्यांच्या माध्यमातून भीमाशंकर येथील पोखरी महाविद्यालय व भामरागड येथील जया पुंगाटी या मुलीची शिक्षणातून प्रगती हा इतिहास कथन केला. डॉ पेढेकर यांनी NEET परीक्षेबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सदरचे कार्यक्रमात खालील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली असून त्यांनी पुढील प्रमाणे गुणवत्ता प्राप्त केली आहे.

अ - इयत्ता १० वि - श्रावणी पटेकर ९१%, समीक्षा कोंढावळे ९२%, आयुष सांगडे ९२.४०%, संस्कृती निर्मळ ९४.४०%, आरती मरभळ ९४.६० %, अनन्या वाजे. ९५.६०%

ब - इयत्ता १२ वि- वैभव घोडे. ७६ %, आर्या गंभिरे ७२%, अक्षय कोकणी. ८०.१७%, रोहन रावते. ९१.१७% आदी विद्यार्थ्यांचा ट्रॉफी, रोख रक्कम व डॉ प्रदीप आंबवणे लिखित शिक्षणाच्या वाटा हा अंक देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचलन किसन भोजने, गंगाराम सांगडे यांनी केले तर खेवजी भोईर यांनी आभार प्रदर्शन मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी खालील संचालकांनी विशेष सहकार्य घेतले.

डॉ पेढेकर, इंजि विलास नवाळी, चिंतामण भुरकुंडे, दिनकर शेळकण्डे, लक्ष्मण भालेकर, सतिश लेंभे, प्रशांत शिंगाडे, ज्ञानदेव बुरुड, गोविंद जंगले, सुदाम चपटे, दुन्दा किर्वे, PC भालिंगे, राजेंद्र रेंगडे, संजय केदारी, सुभाष भवारी, सुभाष मते, GM शेखरे आणि बाळासाहेब रेंगडे इत्यादीं होते.